(सोबत उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष यांचे **"राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत"** या विषयाचे पत्र क्रमांक रासेयो-२०१३/सं.क्र.२०७/१३/साशि-७, दिनांक २३/४/२०१३ ची प्रत सोबत जोडत आहे)

---

क्रमांक : १६/संकीर्ण/२०१३/शा१५५६३
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३ महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७,
मुंबई ४०० ००१.

दिनांक : ९।५।२०१३

प्रति,

१. सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी.

सहसंचालक
तंत्र शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :- कार्यासन क्रमांक १२ मु.का. मुंबई यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

पृ.क्र. तंशिअ/आस्था/इतर/२०१३/२३२८
दिनांक २०/५/२०१३

प्रतिलिपी - माहिती तथा आवश्यक कार्यवाही करिता (सहपत्र [illegible] प्रमाणे)
(१) प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन अमरावती/खामगांव/यवतमाळ/मुर्तिजापूर
(२) प्राचार्य शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय अमरावती
(३) प्राचार्य शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
(४) प्राचार्य शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन यवतमाळ
(५) डॉ. पंजाबराव देशमुख, तंत्रनिकेतन, अमरावती
(६) [illegible] इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी अकोला.
(७) विभागांतर्गत सर्व संस्था.

Joint Director
Technical Education Regional Office,
AMRAVATI.

आवक क्र. २३२८ दि. १७/५/२०१३

महाराष्ट्र शासन

कमांक : रासेयो-२०१३/सं.क्र.२०७/१३/साशि-७
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय कक्ष,
एलफिन्स्टन तंत्र विद्यालय परिसर,
३, महापालिका मार्ग, धोबीतलाव,
मुंबई - ४०० ००१.
दिनांक - २३ एप्रिल, २०१३

श्रा. १५५६३
३/५/२०१३
१६

प्रति,

कार्यक्रम समन्वयक,
सर्व कृषि / अकृषि / आरोग्य / मुक्त विद्यापीठे,
+ २ स्तर / व्यवसाय / तंत्रशिक्षण संस्था

**विषय :** राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.

संदर्भ :१) शासन परिपत्रक, सा.प्र.वि.क्र.एफएलजी-१२०७/प्र.क्र.११/०७/३०, दि.२२.८.०७
२) शासन पत्र, सा.प्र.वि.क्र.फ्लॅग-१०१२/१३१८/३०, दि.७.८.२०१२
३) शासन पत्र, गृह विभाग क्र.रिट याचिका-०११२/२८७/प्र.क्र.७८/विशा१ अ, दि.२६.३.२०१३

उपरोक्त संदर्भाधीन आदेशाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. त्यामधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या विषयावर मा.उच्च न्यायालयामध्ये हिंदू जनजागृती समितीने जनहित याचिका क्र.१०३/२०११ दाख़ल केली असून राष्ट्रध्वजाचा अवमान होत असल्याची दखल मा.उच्च न्यायालयाने घेतली आहे.

सर्वसाधारण प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम तसेच विशेष प्रसंगी कागदी तसेच प्लास्टिक निर्मित राष्ट्रध्वजाचा वैयक्तिकरित्या वापर केला जातो. अशा कार्यक्रमानंतर राष्ट्रध्वज इतस्ततः पडलेले दिसून येतात. प्लास्टिक निर्मित ध्वज बरेच दिवस नष्ट होत नसल्याने व राष्ट्र प्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर असल्याने केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकच्या वापरास मान्यता नाही. याशिवाय खराब झालेले व इतस्ततः पडलेले राष्ट्रध्वज ध्वज संहितेमधील तरतूदींनूसार नष्ट करणे आवश्यक आहे. सबब, राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये यासाठी तसेच राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही याकरिता आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे राष्ट्रध्वजासंदर्भातील सर्व अधिनियमांच्या तरतूदी, या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करयात यावी असेही सर्व संबंधितांना कृपया कळविण्यात यावे.

( डॉ.अतुल हं.साळुंके )
राज्य संपर्क अधिकारी / विशेष कार्य अधिकारी

D:\Parab\Letter.doc

गृह विभाग, ७ वा मजला,
जागतिक व्यापार केंद्र-२, मुंबई-५.
दिनांक २६ मार्च, २०१३

प्रति,

अपर मुख्य सचिव,
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रधान सचिव,
ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव,
उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

पोलिस महासंचालक,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विषय :- राष्ट्रध्वजाच्या वापराबाबत.

राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा यासाठी राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या खालील आदेशान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र.एफएलजी-१२०७/प्र.क्र.११/०७/३०, २२/८/२००७
२) शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग क्र. फ्लॅग- १०१२/१३१८/३०, दि.७/०८/२०१२

त्वरीत संदर्भासाठी उपरोक्त दोन्ही आदेशाच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. त्यामधील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. या विषयावर मा. उच्च न्यायालयामध्ये हिंदू जनजागृती समितीने जनहित याचिका क्र.१०३/२०११ दाखल केली असून राष्ट्रध्वजाचा अवमान होत असल्याची दखल मा. उच्च न्यायालयाने घेतली आहे.

सर्वसाधारणत: प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम तसेच विशेष प्रसंगी कागदी तसेच प्लास्टिक निर्मित राष्ट्रध्वजाचा वैयक्तिकरित्या वापर केला जातो. अशा कार्यक्रमांनंतर राष्ट्रध्वज इतस्तत: पडलेले दिसून येतात. प्लास्टिक निर्मित ध्वज बरेच दिवस नष्ट होत नसल्याने व राष्ट्र प्रतिष्ठेच्या दृष्टीने ही बाब गंभीर असल्याने केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाच्या निर्देशानुसार राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकच्या वापरास मान्यता नाही. याशिवाय खराब झालेले व इतस्तत: पडलेले राष्ट्रध्वज ध्वज संहितेमधील तरतुदींनूसार नष्ट करणे आवश्यक आहे. सबब, राष्ट्रध्वजाचा अवमान होऊ नये यासाठी तसेच राष्ट्रध्वजासाठी प्लास्टिकचा वापर होणार नाही याकरिता आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयांना देण्यात याव्यात त्याचप्रमाणे राष्ट्रध्वजासंदर्भातील सर्व अधिनियमांच्या तरतुदी , या संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी असेही सर्व संबंधितांना कृपया कळविण्यात यावे.

उ.व तं.शि.वि./समन्वय

उपरोक्त विषयानुसार सर्व उपविभागांना आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी कळविण्यात यावे.

आपला

(अमिताभ राजन)
अपर मुख्य सचिव, गृह विभाग.

स.क (समन्वय)

Exh - 'F'

राष्ट्रध्वज वापरण्याच्या योग्य पध्दतीबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एफएलजी-१२०७/प्र.क्र.१३/०७/३०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २००७.

**परिपत्रक :**

दरवर्षी २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन तसेच १ मे रोजी महाराष्ट्र दिन समारंभ राज्यभर साजरे करण्यात येतात. हे समारंभ विविध शासकीय निम शासकीय तसेच खाजगी संस्थामार्फत ध्वजारोहणाने साजरे करण्यात येतात. यावेळी स्थानिक पातळीवर जनतेमार्फत राष्ट्रध्वजाविषयी असलेले प्रेम, निष्ठा, अभिमान दर्शविण्याकरिता वैयक्तिकरित्या छोट्या राष्ट्रध्वजाचा वापर करण्यात येतो.

राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा, या संदर्भात शासनामार्फत वेळोवेळी सूचना दिल्या आहेत. तसेच जाणिवपूर्वक वरील राष्ट्रध्वजाचा अवमान करण्याचा प्रयत्न केल्यास राष्ट्रीय अपमान प्रतिबंध कायदा १९७१ कलम २ अनुसार कार्यवाही करण्यात येते. काहीवेळा राष्ट्रिय कार्यक्रमाच्यावेळी तसेच विशेष कला-क्रीडाप्रसंगी वैयक्तिकरित्या वापरण्यात येणारे राष्ट्रध्वज नंतर इतस्ततः टाकण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. जेणेकरुन नंतर हे छोटे राष्ट्रध्वज रस्त्याच्या कडेला किंवा इतर ठिकाणी पडलेले, विखुरलेले आढळतात. हे दृश्य राष्ट्रप्रतिष्ठेला शोभणारे नसल्याने राष्ट्रध्वजाच्या वापरानंतर एकतर त्याचा योग्य तो मान राहिल याप्रमाणे ते ठेवण्यात यावेत. अन्यथा, जर राष्ट्रध्वज खराब झालेले असतील तर त्याचा योग्य तो मान राखून ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट करणे आवश्यक असते.

अशाप्रकारे असे रस्त्यावर पडलेले इतस्ततः विखुरलेले राष्ट्रध्वज जर प्लॅस्टिकचे असतील तर प्लॅस्टिक बरेच दिवस नष्ट होत नसल्याने असे ध्वज बरेच दिवस त्या ठिकाणी दिसतात. राष्ट्रप्रतिष्ठेच्या दृष्टीने हि बाब गंभीर असल्याने केंद्रशासनाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या निदेशानुसार राष्ट्रध्वजाकरिता प्लॅस्टिकच्या वापरास मान्यता नाही.

जनतेच्या वैयक्तिक वापरासाठी छोटया कागदी ध्वजाचा वापर करण्यात यावा. तथापि, अशा कागदी ध्वजाचा वापर करताना त्याचा योग्य तो मान राखणे आवश्यक आहे. तसेच असे राष्ट्रध्वज रस्त्यावर वा अन्य ठिकाणी फेकून देऊ नये, असे राष्ट्रध्वज खराब झालेले आहेत, असे आढळल्यास ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट करण्यात यावेत.

राष्ट्रध्वजाचा योग्य तो मान राखला जावा, तसेच त्याचा अवमान होऊ नये. यास्तव, जिल्हाधिकारी यांनी स्थानिक पातळीवर नागरीकांना आवाहन करून तसेच जिल्हा, तालुका, ग्रामपंचायत पातळी, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, आरोग्य संस्था, अशा शासकीय/निमशासकीय यंत्रणांमार्फत तसेच सामाजिक अशासकीय संस्था यांच्यामार्फत व आवश्यक पोलीस यंत्रणेच्या मदतीने अशा प्रकारे प्लॅस्टिकच्या राष्ट्रध्वजासाठी वापर होणार नाही आणि असा प्रकार आढळल्यास याची काळजी घ्यावी व समारंभानंतर रस्त्यावर इकडे तिकडे पडलेले / टाकून दिलेले राष्ट्रध्वज आढळून आलेले असतील तर राष्ट्रध्वजाचा योग्य असा मान राखून ते ध्वजसंहितेतील तरतुदीनुसार नष्ट करण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(शे.दि. निजूरे)
सह सचिव व सह मुख्य राजशिष्टाचार
अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

A:\GR on PLASTIC FLAG

संख्या 15/5/2012-पब्लिक
भारत सरकार
गृह मंत्रालय

नार्थ ब्लॉक, नई दिल्ली ।
दिनांक 16 जुलाई, 2012

16 JUL 2012

सेवा में,

सभी राज्य सरकारों/संघ राज्य क्षेत्र प्रशासनों के
मुख्य सचिव/प्रशासक
भारत सरकार के सभी मंत्रालयों/विभागों के सचिव ।

विषय: महत्वपूर्ण राष्ट्रीय, सांस्कृतिक और खेलकूद के अवसरों पर कागज के बने राष्ट्रीय ध्वज के उपयोग के संबंध में ।

महोदय/महोदया,

मुझे भारतीय झंडा संहिता 2002 (प्रति संलग्न) के भाग-II, धारा-I के पैराग्राफ 2.2 (x) की ओर आपका ध्यान आकृष्ट करने का निदेश हुआ है, जिसे नीचे उद्धृत किया गया है:-

" जनता द्वारा कागज के बने झंडों को महत्वपूर्ण राष्ट्रीय, सांस्कृतिक और खेलकूद के अवसरों पर हाथ में लेकर हिलाया जा सकता है । परन्तु ऐसे कागज के झंडों को समारोह पूरा होने के पश्चात् न तो विकृत किया जाएगा और न ही जमीन पर फेंका जाएगा । जहां तक सम्भव हो, ऐसे झंडों का निपटान उनकी मर्यादा के अनुरूप एकान्त में किया जाए;"

2. इस मंत्रालय के संज्ञान में यह लाया गया है कि महत्वपूर्ण अवसरों पर कागज के झंडों के स्थान पर प्लास्टिक के झंडों का प्रयोग किया जा रहा है । चूँकि, प्लास्टिक से बने झंडे कागज के समान जैविक रूप से अपघट्य (bio-degradable) नहीं होते हैं, ये लंबे समय तक नष्ट नहीं होते हैं । इससे झंडे की गरिमा प्रभावित होती है और साथ ही प्लास्टिक के जैविक रूप से अपघट्य न होने के कारण ये वातावरण के लिए भी हानिकारक होते हैं ।

3. अतः आपसे यह सुनिश्चित करने का अनुरोध है कि महत्वपूर्ण राष्ट्रीय, सांस्कृतिक और खेलकूद के अवसरों पर, भारतीय झंडा संहिता के प्रावधान के अनुरूप, जनता द्वारा केवल कागज से बने झंडों का ही प्रयोग किया जाय तथा समारोह के पूरा होने के पश्चात ऐसे कागज के झंडों को न तो विकृत किया जाय और न ही जमीन पर फेंका जाय । ऐसे झंडों का निपटान उनकी मर्यादा के अनुरूप एकान्त में किया जाए । इस विषय में संबंधित सभी को तदनुसार अनुदेश जारी करें ।

संलग्नक: यथोक्त

Flag-10134/3/18/1000
30/07/2012

कार्यालय
23-7-12
DIMS : TOOMR 9156

No. 15/5/2012-Public
Government of India / Bharat Sarkar
Ministry of Home Affairs / Grih Mantralaya
*****

North Block, New Delhi
Dated the 16, July, 2012

18 JUL 2012

The Chief Secretaries / Administrators of
all State Governments / UT Administrations,
Secretaries of all Ministries/Deptts. of Govt. of India.

Subject: Use of National Flag- made of paper on important national, cultural and sports events-clarification reg.

Sir/Madam,

I am directed to invite your attention to Paragraph 2.2 (x) of Section-I of Part-II of the Flag Code of India, 2002 (copy enclosed) reproduced below:-

"the Flag made of paper may be waved by public on occasion of important national, cultural and sports events. However, such paper Flags should not be discarded or thrown on the ground after the event. As far as possible, it should be disposed of in private consistent with the dignity of the Flag;"

2. It has been brought to the notice of this Ministry that on important events, the **National Flag made of plastic** are being used in place of paper Flags. Since, plastic Flags are not biodegradable like the paper flags, these do not get destroyed for a long time. This affects the dignity of the Flag. Also plastic, not being biodegradable, is harmful to the atmosphere.

3. You are, therefore, requested to ensure that on important national, cultural and sports events only Flags made of paper are used by public in terms of the provisions of the Flag Code of India and such paper Flags are not discarded or thrown on the ground after the event. Such Flags are to be disposed of in private consistent with the dignity of the Flag. Suitable instructions in this regard may be issued to all concerned.

Encl: As above.

Pl inform all concerned in Mantralaya and all offices in field

Yours faithfully,

M Shyamala

(Shyamala Mohan)
Director to the Govt. of India
Tel. No. 2309 2587

महाराष्ट्र शासन

☎ २२०२ ५३६१
📠 २२८२ २६२६

क्र.पलॅग-१०१२/१३१८/३०
सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,
मुंबई – ४०० ०३२
दिनांक : ०७.०८.२०१२

प्रति,
अपर मुख्य सचिव, गृह विभाग, वर्ल्ड ट्रेड सेंटर, मुंबई
अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
प्रधान सचिव, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
विभागीय आयुक्त (सर्व)
जिल्हाधिकारी (सर्व)
महासंचालक, माहिती व जनसंपर्क , मंत्रालय, मुंबई
संचालक, क्रिडा व युवक कल्याण संचालनालय, पुणे
संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई

विषय - <u>महत्त्वपूर्ण राष्ट्रीय, सांस्कृतिक आणि क्रिडा सोहळा या प्रसंगी कागदी राष्ट्रध्वज वापरणेबाबत ...</u>

महोदय,

उपरोक्त विषयावरील केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाचे क्र.१५/५/२०१२-पब्लिक, दिनांक १६ जुलै, २०१२ ची प्रत कृपया सोबत जोडली आहे.

केंद्र शासनाच्या गृह मंत्रालयाने महत्त्वपूर्ण राष्ट्रीय, सांस्कृतिक आणि क्रिडा सोहळा या प्रसंगी कागदी राष्ट्रध्वज वापरण्याबाबत काही मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत. आपणास विनंती करण्यात येते की, केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या सूचनांनुसार कार्यवाही करण्याबाबत आपल्या अधिपत्याखालील कार्यालयांना कृपया कळविण्यात यावे.

आपला,
७/८/१२
( शै. वि. बिजूर )
सह सचिव व सह मु.रा.अ.
महाराष्ट्र शासन